**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०६ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यासह देशभरातून आदरांजली, नागपूरच्या दीक्षाभूमीवर अलोट गर्दी.**
2. **इंदू मिलच्या जागेवर बाबासाहेबांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**
3. **भारत आणि दक्षिण आफ्रिके दरम्यानच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाहुण्या संघाचे यजमान संघापुढे २७१ धावांचे आवाहन.**
4. **विदर्भात थंडीची लाट, ९.६ अंश सेल्सियस सह नागपूर जिल्हा सर्वात थंड.**

---

महापरिनिर्वाण दिन

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना ७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज राज्यासह देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. संसद भवनात आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह संसद सदस्यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.बाबासाहेबांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व न्याय, समता आणि संविधानाच्या तत्वांवरची त्यांची निष्ठा भारताच्या वाटचालीत महत्त्वाची ठरली आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि गृहमंत्री अमित शहा यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांनी चेन्नई इथं शालेय विद्यार्थ्यांसमवेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज सकाळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. इंदू मिलच्या जागेवर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राच्या

प्रगतीचा पाया घातल्याचं नमूद करून बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे, अस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले..........

***(होल्ड बाईट- फडणवीस ३४ सेकंद)***

***आज आपण पाहतोय की विविध क्षेत्रामध्ये भारताची प्रगती आपल्याला पाहायला मिळते आणि या प्रगतीच्या पाठीमागे या देशामध्ये जी लोकशाहीची व्यवस्था आमच्या संविधानाने उभी केली. लोकशाहीमुळे खऱ्या अर्थाने भारत प्रगतीकडे चाललेला आहे आणि म्हणूनच आपल्या देशाचे प्रधानमंत्री माननीय मोदीजी देखील अतिशय गौरवाने म्हणतात कि माझ्या करता कुठल्याही धर्मग्रंथापेक्षा भारताचं संविधान महत्वाच आहे तर हे संविधानचं प्रत्येक भारतीयाचं कल्याण करू शकतो.***

आंबेडकर यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी नागपुरातील दीक्षाभूमी इथ मोठ्या प्रमाणात गर्दी केलेली दिसत आहे. परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूरचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी दीक्षाभूमी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.तसच मध्यवर्ती स्तुपात जाऊन देखील अभिवादन केलं. या वेळेला बुद्ध वंदना घेण्यात आली......**(होल्ड बाईट-बुद्धवंदना १६ सेकंद)**

यावेळी दीक्षाभूमी स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. महापरिनिर्वाण दिनानिमित्य महामानवाला अभिवादन करण्यासाठी दीक्षाभूमी येथे देखील अनुयायांनी गर्दी केली आहे. या पैकी एका युवा अनुयायी ने सांगितले.......

***(होल्ड बाईट -अनुयायी)***

***तसं बाबासाहेबांनी आम्हाला दिलेला काही छोटासा नाही आहे त्यांनी आम्हाला भरपूर काही दिलेलं आहे ते तर एका वर्ड मध्ये एक्सप्लेन करता येणार नाही मला, पण त्यांनी जे काही दिलेलं आहे ते भरपूर आहे माझ्यासाठी आणि तसं महामानवांनी दिलेला अधिकार आणि हक्क हे तर म्हणजे आमच्या सातही पिढी नाही करू शकणार एवढं मोठं आम्हाला देऊन सोडून गेलेले आहेत.***

महापरिनिर्वाण दिनानिमित्त काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार तसच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीक्षाभूमी इथं अभिवादन केलं. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील चिचोली शांतीवन येथे मोठ्या प्रमाणात अनुयायांनी गर्दी केलेली दिसत आहे. चिचोली शांतीवन येथे डॉ. बाबासाहेबांच्या स्मारक आणि वस्तु संग्रहाला भेट देण्यासाठी त्यांना अभिवादन करण्यासाठी सकाळपासुनच अनुयायांनी चिचोली शांतीवन येथे मोठ्या प्रमाणात गर्दी केली. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज विशेष व्याख्यान, पुष्पांजली आणि मौन यात्रेच आयोजन करण्यात आलं आहे. आकाशवाणी नागपूरच्या कार्यालयातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला कार्यालय प्रमुख आणि आकाशवाणीच्या उप महासंचालिका मनीषा शेटे यांनी माल्यार्पण करून अभिवादन केलं .यावेळी आकाशवाणी केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. अकोल्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन अकोल्यात मध्यरात्री भव्य कॅण्डल मार्च काढण्यात आला. भंडाराच्या मैत्रेय बुद्ध विहार इथं महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आलं. दरम्यान अनेक आंबेडकरी अनुयायांच्या वतीन रक्तदान शिबिराच आयोजन करण्यात आलं.

---------------------------------------------

‘हिंद-दि-चादर’

नागपूर येथे आयोजित ‘हिंद-दि-चादर’ या धार्मिक-सांस्कृतिक सोहळ्यासाठी देशभरातून भाविक मोठ्या संख्येन येणार असून नगर प्रशासनान विस्तृत वाहतूक आणि पार्किंग नियोजन केल आहे. भाविकांसाठी कोराडी बस डेपो, मानकापूर स्टेडियम, इंदोरा ग्राउंड आणि कामठी रोड येथे बस पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून तेथून ‘झुलेलाल स्पोर्ट्स ग्राउंड’ पर्यंत ‘शटल बस सेवा’ उपलब्ध असेल. दोन आणि चार चाकी वाहनांचे पार्किंग झुलेलाल स्पोर्ट्स ग्राउंड येथे असेल, तर शहरभरातून ई-रिक्शा शटलची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. वाहतूक पोलीस आणि स्वयंसेवकांच्या सूचनांच पालन करून भाविकांनी सहकार्य कराव, अस आवाहन आयोजकांनी केल आहे.

---------------------------------------------

इंडिगो विमान

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आजही इंडिगोची ४०० हुन अधिक उड्डाणं रद्द

झाल्याची माहिती वृत्तसंस्थेनं दिली आहे. यापैकी, बंगळुरू विमानतळावर १२४, मुंबई विमानतळावर १०९ तर पुणे विमानतळावरच्या ४२ विमान सेवा आज रद्द झाल्या आहेत. मात्र, विमान उड्डाणांच्या वेळांमधली दिरंगाई तसंच विमानं रद्द होणं आटोक्यात आलं असून विमान तळांवर आता दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार नसल्याचं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. लहान मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना प्रवासात प्राधान्य देण्यासाठी 'नागरी हवाई वाहतूक मंत्रालय' विमानतळांवर कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली.

---------------------------------------------

परीक्षा-पे-चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या अभिनव उपक्रमाच्या ९ व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर 'मायगव्ह'-या पोर्टलवर देशव्यापी स्पर्धा सुरु आहे. ऑनलाईन बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित ही स्पर्धा ११ जानेवारी पर्यंत खुली राहणार आहे. इयत्ता ६ ते १२ वी पर्यंतचे विदयार्थी तसंच पालक आणि शिक्षक या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र दिलं जाणार आहे.

---------------------------------------------

हवामान

विदर्भात नऊ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानासह नागपूर जिल्हा सर्वात थंड ठरला आहे. नागपूरच्या पाठोपाठ गोंदिया इथं नऊ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तर भंडारा आणि यवतमाळ इथं दहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भातील अन्य जिल्ह्यांमध्ये वाशिम इथं 11 पूर्णांक 8 तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 12 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आज आणि उद्या नागपूर, भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात तीव्र थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

---------------------------------------------

ग्रामविकास विभाग

नागपूर ग्रामीण तालुक्यातील अनेक योजना बाह्य रस्त्यांना आता अधिकृत ग्रामीण मार्गांचा दर्जा देण्यात आला असून ग्राम विकास विभागान याबाबत आदेश जारी केला आहे. या निर्णयामुळे डांबरीकरण, रुंदीकरण, पुलांची दुरुस्ती आणि जलनिकास व्यवस्था यांसारख्या कामांना गती मिळणार आहे.

---------------------------------------------

क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिके दरम्यानच्या एकदिवसीय मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना विशाखापट्टणम इथं सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. पाहुण्या संघाने यजमान संघापुढे जिंकण्यासाठी 271 धावांचं लक्ष ठेवलं आहे. सुरवातीला दक्षिण आफ्रिकेचा सलामीचा फलंदाज क्विंटन डी कॉक नं सर्वाधिक 106 धावा केल्या त्याला कर्णधार टेंबा बावुमा ने चांगली साथ दिली. भारतातर्फे प्रसिद्ध कृष्णाने चार तर, कुलदीप यादवनी ४ गडी बाद केले. शेवटचे वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या षटकात भारताच्या बिनबाद आठ धावा झाल्या होत्या. या मालिकेत भारत आणि दक्षिण आफ्रिकेनं प्रत्येकी एक सामना जिंकल्यानं मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

---------------------------------------------